## निवडक



डिचोली : पालिका स्थायी समितीवर निवड झालेले रियाज बेग, सुदन गोवेकर यांचे अभिनंदन करताना नगराध्यक्ष विजय कुमार नाटेकर. सोबत इतर.

### सुदन गोवेकर, रियाज बेग यांची स्थायी समितीवर बिनविरोध निवड

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २९ : डिचोली पालिका स्थायी समितीवर नगरसेवक सुदन गोवेकर व रियाझ बेग यांचीच बिनविरोध फेरनिवड झाली.

डिचोली नगरपालिका कार्यालयात ही खास स्थायी समितीच्या निवडीसाठी बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीस नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, उपनगराध्यक्षा दीपा पळ, नगरसेवक कुंदन फळारी, दीपा शिरगावकर, सुखदा तेली, नीलेश टोपले, ॲड. रंजना वायंगणकर, अनिकेत चणेकर, रियाझ बेग, सतीश गावकर, तनुजा गावकर, सुदन गोवेकर, मुख्याधिकारी नेहाल तळावणेकर यांची उपस्थिती होती.

तर नगरसेवक गुंजन कोरगावकर व ॲड. अपर्णा फोगेरी अनुपस्थित राहिले. स्थायी समितीसाठी नगरसेवक सुदन गोवेकर व रियाझ बेग यांनी आपले अर्ज भरून सादर केले. या व्यतिरिक्त एकही अर्ज न आल्याने अखेर मुख्याधिकारी नेहाल तळवणेकर यांनी गोवेकर व बेग यांची बिनविरोध निवड जाहीर केली.



लाखेरे बोर्डे : बाळूमामा देवालयाच्या समितीचे अध्यक्ष बाबलो ताटे, सचिव दत्तगुरु फाले, दिलीप वरक व इतर सदस्य.

### संत सद्गुरू बाळूमामा देवालयच्या नूतन समितीच्या अध्यक्षपदी बाबलो ताटे

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २९ : लाखेरे – बोर्डे येथील श्री संत सद्गुरू बाळूमामा देवालयाच्या नूतन समितीच्या अध्यक्षपदी बाबलोताटे तर सचिवपदी दत्तगुरु फाले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

निवड झालेल्या संपूर्ण समितीचे गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळ – डिचोली तालुका समितीचे अध्यक्ष दिलीप वरक , सचिव – उमेश शिंगाडे व इतर सदस्याकडून पुष्पहार घालून हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

निवड झालेली नूतन समिती पुढील प्रमाणे : अध्यक्ष – बाबलो ताटे, सचिव – दत्तगुरु फाले, खजिनदार – सुरज फाले , उपाध्यक्ष – सगुण गवळी, उपसचिव – तुकाराम ताटे, उपखजिनदार – संदीप ताटे, सल्लागार – प्रदीप ताटे, काली ताटे, कार्यकारी सदस्य – सुरेश ताटे, नीलेश भागोजी ताटे, सदस्य – चंद्रकांत फाले, भैरू दोरे , चंद्रकांत ताटे , रामा ताटे आदी होय.

### काणकोण आयटीआयमध्ये अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २९ : नव्या शैक्षणिक वर्षासाठी काणकोण आयटीआय केंद्रांत या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.काणकोण तालुक्यातील इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. असे आवाहन काणकोण आयटीआय केंद्राच्या प्रमुखानी केले आहे.

काणकोण आयटीआय केंद्रांतील तांत्रिक विभागातील फिकर, इलेक्ट्रिक्शन, डिझेल मेकॅनिक, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, वायरमन, प्लंबर या अभ्यासक्रमासाठी एकूण १५२ जागा आहेत. त्यांतील काही प्रशिक्षण वर्ग दोन तर काही प्रशिक्षण वर्ग एक वर्ष कालावधीचे आहेत. त्यासाठी काही वर्गासाठी १० वीज तर काही वर्गासाठी ८ वी उत्तीर्ण आवश्यक आहे.

बिगर तांत्रिक गटांमध्ये ओपरेटर, हाऊस किपर, अन्न प्रक्रिया, स्वीस सहाय्यक, ड्रायव्हर कम मेकॅनिक, सर्व्हिंग तंत्रज्ञ, याकरता एकूण १३२ इतक्या जागा आहेत. हे वर्ग एका वर्षाच्या कालावधीकरता आहेत. त्यासाठी काही अभ्यासक्रमासाठी ८ वी तर काही वर्गासाठी १० वी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. वरील सर्व वर्गांत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सद्या प्रवेश खुला करण्यात आला आहे. दि. ५ मे पुर्वी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून त्याचा लाभ काणकोणच्या तमाम युवकांनी करून घेण्याचे आवाहन काणकोण आयटीआय केंद्राच्या प्रमुखानी केले आहे.

### केरी येथील रवळनाथ मंदिरात १ मे रोजी 'रायगडाला जेव्हा जाग येते'

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २९ : केरी येथील ग्रामदेव श्री रवळनाथ देवस्थानचा ७ वा वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त गुरुवार १ मे रोजी संध्या ७.३० वा केरी शिवराज्य प्रतिष्ठान निर्मित, ऐतिहासिक 'रायगडाला जेव्हा जाग येते' नाटक केरी श्री देव रवळनाथ मंडपात होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शन गौरेश शेटगावकर, सहाय्य योगेश काळोजी, रंगभूषा जितेंद्र परब, ध्वनी केवल कळंगुटकर,सूत्रधार विनोद नाईक, पार्श्वसंगीत साई कळंगुटकर सहाय्यक विष्णू पोखरे, रंगमंच गुरुप्रसाद नाट्य भांडार कासारपाल यांची आहे. सदर नाटकात रमाकांत सावंत, राजू कळंगुटकर, विष्णू केरकर, योगेश काळोजी, नवीन कुबल, कैवल्य परब, संजना तळकर व सोनिया शेट्ये तसेच प्रेमानंद कांबळी व श्रीकांत कान्होजी यांच्या भूमिका आहेत.ह्या नाटकास निर्मिती सहाय्य ग्रामदेव श्री देव रवळनाथ देवस्थान ट्रस्ट व आमदार जीत आरोलकर यांची आहे. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

### तिशे बोरी पैपाळ येथील विठ्ठल रखुमाई देवस्थानात १ मे रोजी सार्वजनिक महा सत्यनारायण पूजा

■ टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि, २९ : बोरी तिशे येथील पैपाळ वाड्यावरील श्री विठ्ठल रखुमाई देवस्थानात वार्षिक महासत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर पुजा दि. १ मे रोजी दुपारी ३.३० वाजता यजमान कमलाकर नाईक बोरकर यांच्या यजमानपद खाली होणार असून या निमित्ताने संध्याकाळी बोरी येथील प्रसिद्ध भजनी मंडळ नवसाई भजनी मंडळातर्फे भजन नंतर ८ वाजता पालखी फेरी नंतर महाआरती यावेळी श्री विठ्ठल रखुमाई देवस्थानात ट्रस्टतर्फे देणगीकुपनाचे अनावरण करण्यात येईल. नंतर महाप्रसाद वाटप करण्यात येणार सदर कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे ट्रस्टतर्फे कळवीण्यात आले आहे.

# उघड्यावर कचरा टाकल्याने लोटलीवासीयांचा संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** लोटलीमधील कचरा व्यवस्थापनाच्या समस्येबद्दल रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सोमवारी, एका स्थानिक केटरिंग ऑपरेटरला लोटली पठारावर बेकायदेशीरपणे ओला कचरा टाकताना पकडण्यात आले, ज्यामुळे या समस्येचे गांभीर्य आणखी वाढले आहे.

ही घटना लोटली कोमुनिदाद मालकीच्या जमिनीवर घडली. साक्षीदारांच्या माहितीनुसार, काही जागरूक नागरिकांना पठारावर संशयास्पद हालचाली दिसल्या, त्यानंतर त्यांना कचऱ्याचा मोठा ढीग टाकताना आढळला. अधिक चौकशी केल्यानंतर, कचरा टाकणारी व्यक्ती स्थानिक केटरिंग व्यवसायाशी संबंधित असल्याचे सांगितले जात होते. आरोपीने पंचायतीच्या सचिवांनी त्याला कचरा टाकण्याची तोंडी परवानगी दिल्याचा दावा केला, ज्यामुळे परिस्थिती तणावपूर्ण झाली.

तथापि, लोटली ग्रामपंचायतीने या दाव्याला त्वरित नकार दिला. सरपंच जोआना फर्नांडिस यांनी स्पष्ट केले की, पंचायत किंवा तिच्या सचिवाने कचरा टाकण्यासाठी कोणतीही परवानगी दिली नाही.

कोमुनिदाद जमिनीवर कचरा टाकण्यासाठी पंचायत किंवा सचिवांनी कोणतीही परवानगी दिलेली नाही. केटरिंग व्यवसायासाठी एनओसी जारी केली गेली होती, परंतु कचऱ्याचे व्यवस्थापन केवळ ऑपरेटरची जबाबदारी होती, फर्नांडिस म्हणाल्या. या घटनेनंतर पंचायतीने स्थानिक पोलिसांकडे केटरिंग व्यवसाय मालकाविरुद्ध कचरा टाकण्याबाबत औपचारिक तक्रार दाखल केली आहे.लोटली कोमुनिदाद अध्यक्ष ब्लेझ ब्रिटो यांनी या कृत्याचा निषेध केला आणि अशी कृती खपवून घेतली जाणार नाही असा इशारा दिला.



ओला कचरा टाकताना आम्ही आरोपीला रंगेहाथ पकडले. पंचायतीने त्याला असे करण्याचे निर्देश दिले असल्याचा दावा खूप चिंताजनक आहे. पर्यावरणीय दुर्लक्षाची अशी कृत्ये अस्वीकार्य आहेत. आम्ही कोमुनिदाद जमिनीचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलू, असे ब्रिटो यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

गावातील व्यवसायांच्या कचरा व्यवस्थापनाबाबत अंमलबजावणीच्या आणि देखरेखीच्या अभावाबद्दल स्थानिक रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. विशेषत: केटरिंग, हॉटेल्स आणि बँक्वेट हॉलसारख्या मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या उद्योगांना परवानग्या देताना पंचायतीने कठोर नियम आणि शर्ती ठेवाव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

हे केवळ निष्काळजीपणाचे नाही, तर एक गंभीर आणि वारंवार उद्भवणारे मुद्दा आहे. जर अधिकाऱ्यांनी आता कारवाई केली नाही, तर आपल्याला पर्यावरणाचे दीर्घकालीन नुकसान होईल, एक चिंतेत असलेला रहिवाशी म्हणाला.

या मुद्द्यामुळे फक्त राजकीय वादच निर्माण झालेले नाही, तर गोव्यातील अर्ध–शहरी आणि ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापनाच्या कमकुवततेबद्दल चिंता देखील वाढली आहे. पोलिसांनी तपास सुरू केल्यामुळे, गावकऱ्यांची अपेक्षा आहे की, त्वरित आणि ठोस कारवाई केली जाईल, जेणेकरून भविष्यातील उल्लंघनांना रोखता येईल.

## उच्च न्यायालयात ध्वनी प्रदूषणावर कार्यवाही

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २९ :** गोवा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला माहिती देण्यात आली की, २० पैकी १३ ओपन–एअर युनिट्सने त्यांच्या आवाज निरीक्षण प्रणालीवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. हे युनिट्स न्यायालयाच्या ध्वनी नियमांचे पालन करण्याच्या हेतूने ही कार्यवाही करत आहेत.

२०२३ च्या अवमान याचिका १२ च्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी विचारले की, गोवा येथील ओपन–एअर आस्थापना रात्री १० वाजण्याच्या मुदतीनंतर ॲम्प्लिफाइड संगीत वाजवितात का? यासाठी न्यायालयाने युनिट्सच्या आवाज निरीक्षण प्रणालीचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोस्टा फ्रियास यांनी याचिकेची सुनावणी सुरू करतांना न्यायालयाला सांगितले की, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याची अपेक्षा सुट्टीपूर्वी करण्यात आली होती, आणि बागा येथील झेवियर रिट्रीट हाऊसने २०२१ च्या रिट याचिका जनहित याचिका ७ मध्ये मध्यस्थी अर्ज दाखल केला होता.

न्यायमूर्ती डांगरे यांनी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (जीएसपीसीबी) वकिलांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात सीसीटीव्ही यंत्रणा असलेल्या ओपन–एअर युनिट्सची यादी दिली. सर्वोच्च न्यायालयाने रात्री १० वाजल्यानंतर ओपन–एअर संगीत बंद करण्याचा आदेश दिला असून, उल्लंघन करणाऱ्यांचा मागोवा घेण्यासाठी सीसीटीव्ही रेकॉर्डिंगचा वापर करण्यास आग्रह धरला आहे. जीएसपीसीबीच्या वतीने न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात सांगण्यात आले की, ३६ ओपन–एअर युनिट्सपैकी २० युनिट्समध्ये ध्वनी डेसिबल पातळी दर्शविणारे इलेक्ट्रॉनिक साइनबोर्ड बसवले आहेत. परंतु, जीएसपीसीबीने ही व्यवस्था न पाळणाऱ्या युनिट्सची सूची सादर केली आहे. न्यायमूर्ती महादेव आरोंदेकर यांनी न्यायालयाला सांगितले की, जीएसपीसीबीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या बाबतीत आदेश दिले आहेत. पर्यटन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या समुद्रकिनाऱ्यावरील झोपड्यांसह इतर आस्थापनांना ३० दिवसांचा बॅकअप ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, ज्याचा वापर जीएसपीसीबी आणि पोलिसांना आवश्यकतेनुसार करता येईल.

न्यायमूर्ती डांगरे यांनी न्यायालयाच्या पुढील सुनावणीसाठी संबंधित आस्थापनांना निर्देश दिले की, ज्या युनिट्सने सीसीटीव्ही आणि ध्वनी निरीक्षण प्रणाली बसवले नाहीत, त्यांना नियमांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जीएसपीसीबीच्या तपासणी अहवालानुसार, ९ ते ११ एप्रिल दरम्यान २० युनिट्सला भेटी दिल्या गेल्या, परंतु हाऊस ऑफ शापोरा याचे मूल्यांकन करण्यात आले नाही. तसेच, काही युनिट्समध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि ध्वनी निरीक्षण प्रणाली कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले.सदरील प्रकरणाची पुढील सुनावणी १९ जून २०२५ रोजी होईल.

## ईडीकडून २३२ कोटींच्या २४ मालमत्तांची तात्पुरती जप्ती

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) पणजी झोनल कार्यालयाने मंगळवारी माहिती दिली की, मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा २००२ अंतर्गत कारवाई करत बार्देश तालुक्यातील कळंगुट, आसगाव, हणजूण, नेरुळ व पर्रा या भागातल्या २४ स्थावर मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त करण्यात आल्या आहेत.

ही या प्रकरणातील दुसरी मोठी कारवाई असून याआधी २०२३ मध्ये ईडीने ३१ मालमत्ता जप्त केल्या होत्या, ज्यांची एकूण किंमत ३९.२४ कोटी रुपये होती. त्या जप्तीला नवी दिल्ली येथील न्यायनिवाडा प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. गोवा पोलिसांच्या विशेष तपास पथकाने जमीन हडप प्रकरणात बनावट कागदपत्रांची निर्मिती, फसवणूक आणि बेकायदेशीर मालमत्ता संपादन प्रकरणांवर अनेक गुन्हे दाखल केले असून, त्याआधारे ईडीने या आर्थिक गैरव्यवहारांची सखोल चौकशी सुरू केली. ईडीच्या तपासात उघड झाले आहे की, काही आरोपींनी मृत व्यक्ती किंवा त्यांच्या पूर्वजांच्या नावे बनावट दस्तावेज तयार केले आणि त्याद्वारे गोवा सरकारच्या जमिनीच्या नोंदीमध्ये फेरफार करत, बनावट विक्री दस्तावेजांच्या आधारे या मालमत्ता इतर व्यक्तींना विकल्या किंवा त्यांच्या सहकाऱ्यांच्या नावे हस्तांतरित केल्या. सद्यस्थितीत जप्त केलेल्या २४ मालमत्तांमध्ये अशा स्थावर मालमत्तांचा समावेश आहे ज्या तृतीय पक्षांना विकल्या गेल्या, किंवा सहकाऱ्यांच्या नावे खोट्या कागदपत्रांच्या आधारे वर्ग करण्यात आल्या होत्या. या मालमत्ता बार्देश तालुक्यातील प्रमुख पर्यटन क्षेत्रांमध्ये असल्याचेही निदर्शनास आले आहे.या कारवाईनंतर गोवा जमीन घोटाळा प्रकरणात आतापर्यंत ईडीने एकूण २३२.७३ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त केल्या आहेत.

या प्रकरणात १२ एप्रिल २०२४ रोजी म्हापसा येथील पीएमएलए विशेष न्यायालयात फिर्यादी दाखल करण्यात आली असून, न्यायालयाने याची दखल घेतली आहे. पुढील तपास सुरू असल्याचे ईडीच्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

## ब्लू कॅब टॅक्सी काउंटर आजपासून सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ब्लू कॅब प्रीपेड टॅक्सी सेवा आजपासून पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सुरक्षा मंजुरीसंदर्भातील प्रक्रिया दोन दिवसांत गतीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे, अशी माहिती पेडणे आमदार प्रवीण आर्लेकर यांनी दिली.

आर्लेकर यांनी पर्वरी येथील मंत्रालयात ब्लू कॅब प्रीपेड टॅक्सी असोसिएशनच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री सावंत यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. सुरक्षा मंजुरीच्या प्रक्रियेमुळे ब्लू कॅबचे ऑपरेशन्स अडकले होते. मुख्यमंत्र्यांनी ही प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असून, उद्यापासून काउंटर पुन्हा सुरू होईल, असे आर्लेकर यांनी सांगितले.

यापूर्वी, जीएमआर एअरपोर्ट्स लिमिटेड ने ब्लू कॅब प्रीपेड टॅक्सी ऑपरेटरना नोटीस बजावून त्यांच्या सेवांचे कामकाज १५ एप्रिल २०२५ पासून थांबवले होते. कारण म्हणून गृह मंत्रालय आणि नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो यांच्याकडून आवश्यक सुरक्षा मंजुरी न मिळाल्याचे नमूद करण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर, जीएमआरने ब्लू कॅब प्रीपेड टॅक्सी असोसिएशनचे अध्यक्ष संजय कांबळी यांना उद्देशून पत्रव्यवहार करत याआधी जून २०२४ आणि जानेवारी २०२५ मध्येही मंजुरीच्या अभावाबाबत सूचना दिल्या असल्याचे स्पष्ट केले होते. २३ नोव्हेंबर २०२३ रोजी करण्यात आलेल्या परवाना करारानुसार, ही मंजुरी मिळवणे आवश्यक असल्याचे नमूद आहे. सध्या काउंटर बंद असला तरी, मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपामुळे आणि दिलेल्या आश्वासनामुळे ३० एप्रिल २०२५ पासून मोपा विमानतळावरील ब्लू कॅब सेवा पुन्हा सुरू होण्याची शक्यता बळावली आहे.

## ई–बस सेवेला प्रवाशांचा वाढता प्रतिसाद

### ९ महिन्यांत १.९३ कोटींचे उत्पन्न

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २९ :** स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या इलेक्ट्रिक बस उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळत असून सध्या सात मार्गांवर ४८ ई–बस धावत आहेत. या बस सेवेने पहिल्या नऊ महिन्यांत तब्बल ₹१.९३ कोटींचे उत्पन्न मिळवले असल्याची माहिती इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीत रॉड्रिग्ज यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

रॉड्रिग्ज यांनी सांगितले की, जुलै २०२४ मध्ये या सेवेतून रु. ६.४९ लाख इतके उत्पन्न झाले होते, तर मार्च २०२५ मध्ये हेच उत्पन्न वाढून रु. २७.२४ लाखांवर पोहोचले आहे. ही वाढ ई–बस सेवेबाबत नागरिकांमध्ये वाढत असलेल्या विश्वासाचे द्योतक आहे, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, प्रवाशांमध्ये कॅशलेस व्यवहारांची लोकप्रियता वाढत असून सध्या एकूण महसुलापैकी ३४ टक्के उत्पन्न डिजिटल व्यवहारांमधून मिळत आहे. उर्वरित ६५ टक्के महसूल अद्यापही रोख स्वरूपात गोळा केला जात आहे. जुलै २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एकूण १६,१९,७९६ प्रवाशांनी या ई–बस सेवेचा लाभ घेतल्याचेही रॉड्रिग्ज यांनी यावेळी स्पष्ट केले.



काही प्रवाशांनी 'कंडक्टर नसलेल्या' बसमध्ये रोख स्वीकारला जात नसल्याबाबत तक्रार केल्यानंतर रॉड्रिग्ज यांनी स्पष्टीकरण दिले की, ड्रायव्हर फक्त बस थांबवूनच रोख रक्कम स्वीकारतो. बस सुरू असताना सुरक्षा कारणास्तव रोख स्वीकारणे शक्य नसते. बस स्टँडच्या डिझाइन संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना रॉड्रिग्ज म्हणाले की, एक मानक बस स्टॉप बांधण्यात आला आहे. मात्र, *कदंब ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लिमिटेडआणि कंत्राटदार यांच्यात काही मुद्द्यांवर मतभेद आहेत. येत्या २ मे रोजी या मुद्यावर बैठक होणार असून वाद लवकरच मिटेल, अशी आशा आहे.

अपंग प्रवाशांसाठी बसमध्ये कोणत्या सुविधा आहेत, याबाबत विचारल्यावर रॉड्रिग्ज म्हणाले की, सर्व ई–बस कमी मजल्याच्या असून त्यात रॅम्पची सुविधा आहे. तसेच व्हीलचेअरसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध आहे. बसमध्ये प्रवेशासाठी प्रवाशांनी ड्रायव्हरला विनंती करावी लागते. भाडेवाढीविषयी विचारल्यावर रॉड्रिग्ज यांनी स्पष्ट केले की, सध्या कोणतीही भाडेवाढ प्रस्तावित नाही. उलट डिजिटल पेमेंट करणाऱ्या प्रवाशांना आम्ही १० टक्क्यांची सूट देत आहोत.

## खारेबांध येथील आगीनंतर स्ट्रक्चरल ऑडिट अहवालास विलंब

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** मडगाव येथील खारेबांध येथील एका बहुमजली निवासी इमारतीत नुकतीच लागलेली भीषण आग नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. आपत्कालीन सेवांच्या तत्परतेमुळे जीवितहानी टळली असली तरी, इमारतीची संरचनात्मक स्थिरता तपासणाऱ्या अहवालाच्या विलंबामुळे रहिवाशांमध्ये चिंता वाढली आहे. अधिकाऱ्यांनी हा अहवाल लवकर जाहीर करावा, अशी रहिवाशांची मागणी आहे.

आगीमुळे इमारतीला मोठे नुकसान झाले असून, अनेक कुटुंबांना तात्काळ स्थलांतर करावे लागले. इमारतीच्या सुरक्षिततेची पाहणी करूनच रहिवाशांना परत घरी परत येण्याची परवानगी देण्यात यायला हवी होती. तथापि, सद्य स्थितीतील दृश्यमान नुकसान आणि परिस्थितीच्या गंभीरतेनंतरही संबंधित अधिकारी अधिकृत स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल सार्वजनिक करण्यास विलंब करत आहेत.

आम्हाला सांगितले होते की मूल्यांकन त्वरित केले जाईल, परंतु अनेक दिवसांचा कालावधी गेला आहे आणि अजूनही काहीही माहिती मिळालेली नाही. अधिकाऱ्यांना काहीतरी मोठे घडण्याची प्रतीक्षा आहे का? अशी नाराजी सॅव्हियो कुतिन्हो यांनी व्यक्त केली, ज्यांच्या कुटुंबाला इमारत सोडण्यास भाग पाडले गेले. यासोबतच, स्थानिक अधिकाऱ्यांकडून संवादाच्या अभावामुळे परिस्थिती अधिक गडबडलेली आहे, एमएमसीचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सांगितले की, इमारतीच्या स्ट्रक्चरल तपासणीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, संबंधित अहवाल लवकरच जाहीर केला जाईल.

सुरक्षेसंबंधी काम करणारे संघटनांचे म्हणणे आहे की, अहवालाची विलंबाची प्रक्रिया केवळ जनतेचा विश्वास कमी करत नाही, तर शहरी गृहनिर्माण क्षेत्रातील अग्नि सुरक्षा आणि संरचनात्मक अखंडतेवरील प्रश्न उभे करतो.

घटनेने पुन्हा एकदा इमारतींमध्ये अग्नि आणि संरचनात्मक सुरक्षा नियमांची आवश्यकता अधोरेखित केली आहे. अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी रहिवाशांनी स्थानिक प्रशासनाला परिसरातील इतर इमारतींचे व्यापक ऑडिट करण्याची विनंती केली आहे.

आजही अनिश्चितता कायम असून, विस्थापित झालेल्या रहिवाशांची चिंता वाढत आहे. प्रशासन आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहेत का, यावर प्रश्न उभे राहिले आहेत. हा विलंब जितका वाढेल, तितके स्थानिक प्रशासनावर आणि त्याच्या कार्यप्रणालीवर विश्वास कमी होईल.